नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १०/०३/२०२६ (मंगळवार )

## ८ महीन्यापुर्वी खुन करून मृतदेह पुरणारे ५ आरोपी अटक मा. पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांना मिळालेल्या गोपनिय माहीतीवरून गुन्हा उघड

पोलीस स्टेशन रामटेक :— **मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या गोपनिय सुत्रांमुळे ८ महीन्यापुर्वी घडलेल्या एका खुनाच्या गुन्हयाची उकल झाली आहे.** सदर प्रकरणाची सविस्तर माहीती अशी आहे की, दिनांक ०९/०३/२०२६ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की, पोलीस स्टेशन रामटेक परिसरातील रामटेक ते तुमसर रोडवरील टुरीस्ट ढाबा चे मालक कैलास ठाकरे, रा. नवरगाव याने त्याचे मौजा नवरगाव शिवारातील शेतामध्ये एका इसमाचे प्रेत कोणालाही माहीती न करता परस्पर जमिनीमध्ये पुरले आहे. अशी माहीती प्राप्त होताच मा. पोलीस अधिक्षक यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला नमुद माहीती बाबत तात्काळ सविस्तर चौकशी करण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तात्काळ नमुद ठिकाणी जावुन कैलास ठाकरे यांचे कडे कामाला असलेले १) शिवराम पोतन मरकाम, वय ५० वर्षे रा. मु. नवरगाव कॉलनी, त. रामटेक २) धर्मराज ताराचंद वरठी, वय ४५ वर्ष, रा. आमगाव त. रामटेक आणि ३) धिरज धनराज वानखेडे वय ३७ वर्षे रा. नवरगाव ता. रामटेक यांना ताब्यात घेवुन त्यांना विश्वासात घेवुन त्यांच्याकडे कौशल्यपुर्ण विचारपुस करून चौकशी केली असता त्यांनी माहीती दिली की, कैलास ठाकरे यांचे टुरीस्ट ढाब्यावर काम करणारा ठाकुर नावाचा कुक याने मागील वर्षी जुलै महिन्यामध्ये फाशी घेतली होती. कैलास ठाकरे आणि वर नमुद तिन्ही इसमांनी मिळुन कैलास ठाकरे यांचे नवरगाव शिवारातील

शेतामध्ये ठाकुर याचे प्रेत खड्डा करून पुरले आहे. त्यानंतर कैलास ठाकरे, रा. नवरगाव याला सुध्दा ताब्यात घेवुन विचारपुस केली. त्यानंतर रामटेक पोलीसांनी सदर घटनास्थळी जावुन तहसिलदार यांच्या समक्ष पंचनामा करून प्रेत उकरून काढले.सदर प्रकरणी पोलीस स्टेशन रामटेक येथे मर्ग नोंद करण्यात आला.

रामटेक पोलीस यांनी वरीष्ठ पोलीस अधिकारी यांच्या मार्गदर्शनात सदर प्रकरणाचा सखोल आणि कौशल्यपुर्ण तपास करीत सदर प्रकरणात टुरिस्ट ढाबा चालक पियुष कैलास ठाकरे, वय २३ वर्ष रा. नवरगाव याला विचारपुस केली असता, त्याने माहीती दिली की, टुरीस्ट ढाब्यावर काम करणारा कुक प्रताप बैस (ठाकुर) हा नेहमी दारू पिवुन अश्लिल शिवीगाळ करायचा तसेच दिनांक २०/०७/२०२५ रोजी त्याने एक मोबाईल सुध्दा चोरी केला होता. दिनांक २६/०७/२०२५ रोजी धाब्याच्या बाजुला असलेलया गोठयात प्रताप बैस (ठाकुर) याने दोरी घेवुन फास तयार केल्याचे पियुष ठाकरे याला दिसले. तेव्हा त्याने त्याला विचारपुस केली असता प्रताप बैस (ठाकुर) याने मोबाईल चोरीबाबत आळ लावला आणि पगार कामी देतो म्हणुन पियुष ठाकरे ला अश्लिल शिवागाळ केली. त्यावेळी प्रताप बैस (ठाकुर) हा दारू प्यायलेला होता. पियुष ठाकरे याचे मनात प्रताप बैस (ठाकुर) बद्‌दल अधीच राग असल्यामुळे त्याने दोरीचा फास त्याच्या गळयात टाकुन त्याला फासावर लटकवुन जिवानिशी ठार केले.

**मृतक नामे प्रतापसिंह महादेवसिंग बैस, वय ५० वर्ष रा. आंबेडकर नगर रा.विले पार्ले, मुंबई ह.मु. टुरिस्ट ढाबा, नवरगाव याचा दिनांक २६/०७/२०२५ रोजी रात्रीचे ११.०० वा. दरम्यान खुन करून त्याच्या मृत्यूबाबत कोणालाही महीती न देता त्याचा मृतदेह परस्पर पुरल्या प्रकरणी आरोपी क्रं १) पियुष कैलास ठाकरे, वय २३ वर्ष ,रा.नवरगाव २) कैलास माणिकराव ठाकरे, वय ५३ वर्ष, रा.नवरगाव ३)शिवराम पोतन मरकाम, वय ५० वर्षे रा.मु. नवरगाव कॉलनी, त. रामटेक जि.नागपुर, ४) धर्मराज ताराचंद वरठी, वय ४५ वर्ष, रा.आमगाव त. रामटेक जि.नागपुर ५) धिरज धनराज वानखेडे, वय ३७ वर्षे, रा. नवरगाव ता. रामटेक जि.नागपुर यांचेविरुध्द कलम १०३(१), २३८, ३(५) भारतीय न्याय संहीता २०२३ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. नमुद सर्व आरोपींना अटक करण्यात आली आहे.**

# अल्पवयीन बालीकेचा विनयभंग करणाऱ्या आरोपीला मा. न्यायालयाने सुनावली शिक्षा

# नागपुर ग्रामीण जिल्हयातील नविन फौजदारी कायदयाअंतर्गत तीन दिवसात दुसरी मोठी दोषसिध्दी (शिक्षा)

**पो.स्टे. काटोल** :– फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे अप. ७८४/२०२४ कलम ७४, ७५, ७६, ३५१(३), ३५२ भान्यासं सहकलम ८ पोक्सो कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

सदर गुन्हयाची हकीकत याप्रमाणे आहे की, दिनांक १२/०९/२०२४ रोजी फिर्यादी हे त्यांची अल्पवयीन पिडीत मुलगी वय १२ वर्ष ०६ महिने हिचेसह राशनचे धान्य आणण्याकरीता त्याचे मोपेड गाडीने आले व राशनचे धान्य घेवुन परत जात असता .हातला बस स्टॉप जवळ यातील आरोपी नामे **वैभव संजय पोजदार, वय २६ वर्ष, रा. हातला ता. काटोल जि. नागपूर** याने फिर्यादीला मौजा डोरली गावापर्यंत सोडुन दे असे म्हणुन आरोपी हा फिर्यादीचे गाडीवर त्याचे मागे बसला त्याचे मागे फिर्यादीची मुलगी असे मिळुन ट्रिपलसिट गावाकडे जात असता मौजा चारगाव जवळ यातील आरोपी याने फिर्यादीचे मुलीचे दोन्ही हात पकडुन एका हाताने तिला अश्लिल स्पर्श करून तिचा विनयभंग केला. फिर्यादीने हटकले असता फिर्यादीला आणि त्याच्या मुलीला जिवाने मारण्याची धमकी दिली.

पोलीस उपनिरीक्षक श्री गजानन कंगाले, नेमणुक पोस्टे काटोल यांनी सदर प्रकरणाचा सखोल तपास करून आरोपी विरूध्द सबळ पुराव्यानिशी दोषारोपत्र मा. न्यायालयात दाखल केले. **दिंनाक ०९/०३/२०२६ रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायधीश क्रं ०३ श्री एस.एच. ग्वालानी यांनी वरील नमुद आरोपी वैभव संजय पोजदार, वय २६ वर्ष, रा. हातला ता. काटोल जि. नागपूर यास १) कलम ७४ भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास २) कलम ७५(i)(ii) भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ३) कलम ७६ भान्यासं मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ४) ३५१(२) भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ५) ३५२ भान्यासं मध्ये ०१ वर्ष सश्रम कारावास व १०००/—रू दंड. दंड न भरल्यास १५ दिवस साधा कारावास ६) कलम ०८ पोक्सो मध्ये ०३ वर्ष सश्रम कारावास व २०००/—रू**

**दंड. दंड न भरल्यास ०२ महिने साधा कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयातील नविन फौजदारी कायदयाअंतर्गत तीन दिवसात दुसरी मोठी दोषसिध्दी (शिक्षा) आहे.**

सरकारचे वतीने ए.पी.पी. श्रीमती कल्पना पी. पांडे यांनी काम पाहीले. सदर खटल्याच्या सुनावली दरम्यान श्री पराग पोटे, उपविभागिय पोलीस अधिकारी, काटोल विभाग, पोलीस निरीक्षक श्री विशाल गिरी, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण, पोलीस निरीक्षक श्री रंजीत शिरसाठ, प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन काटोल, सपोनि श्री विशांत नांदगाये, दोषसिध्दी कक्ष, नागपुर ग्रामीण यांनी महत्वपुर्ण योगदान दिले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन पोलीस हवालदार बाबा नेवारे, ब. नं. ८२ पोलीस स्टेशन काटोल यांनी मदत केली आहे.

## पोलीस स्टेशन बेला हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०२ गुन्हे नोंद

**पोलीस स्टेशन बेला** :— दिनांक ०९/०३/२०२६ रोजी पोलीसस्टेशन बेला हद्दीत सट्टापट्टी चालविणाऱ्यांवर कारवाई करून गुन्हे नोंद करण्यात आले.

**कारवाई क्र. १.** स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकास गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा शेडेश्वर येथे काही इसम लोकांकडुन पैसे घेवुन सट्टापट्टीचे आकडे लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीस घटनास्थळी पोहचले असता मौजा शेडेश्वर येथे **आरोपी नामे १) नरेश बंडुजी शिवरकर, वय २८ वर्ष, रा. शेडेष्वर, ता. उमरेड, जि. नागपुर ०२) गजानन महादेव किन्नाके, वय ३२ वर्ष, रा. शेडेश्वर, ता. उमरेड, जि. नागपुर** हे कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आले. पोलीसांनी पंचसमक्ष घटनास्थळावरून १) सट्टापटटी साहित्य २) नगदी ११४०/— रूपये असा एकुण ११४०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**कारवाई क्र. २.** बेला पोलीसांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर माहीती मिळाली की, पोस्टे बेला येथील मौजा सिर्सी येथे **३) हरीदास गोंविदा कुंभारे, वय ६८ वर्ष, रा. महालगांव ता. भिवापुर जि. नागपुर** हा कागदावर आकडे लिहुन सट्टापट्टी चालवित असतांना मिळुन आला. पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून १) सट्टापटटी साहित्य २) नगदी १३०/—

रूपये असा एकुण १३०/—रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. दोन्ही कारवाईत असा एकुण १२७०/—रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**नमुद आरोपी क्रं १) नरेश बंडुजी शिवरकर, वय २८ वर्ष, रा. शेडेष्वर, ता. उमरेड, जि. नागपुर ०२) गजानन महादेव किन्नाके, वय ३२ वर्ष, रा. शेडेश्वर, ता. उमरेड, जि. नागपुर ३) हरीदास गोंविदा कुंभारे, वय ६८ वर्ष, रा. महालगांव ता. भिवापुर जि. नागपुर यांच्या विरूद्ध कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार अधिनियम सहकलम ४९ भा. न्या.सं. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणाऱ्या तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०९ गुन्हे नोंद

दिनांक ०९/०३/२०२६ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ५०५०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये एकुण ०९ गुन्हे दाखल करण्यात आले आहे.

**पोलीस स्टेशन खापा** अंतर्गत आरोपी विजय चन्द्रभान खंडाते, वय ३६ वर्ष, रा. कोरमेटा, ता. सावनेर, जि. नागपूर याचेवर १ गुन्हा नोंद **पोलीस स्टेशन नरखेड** अंतर्गत आरोपी क्र. १) महिला आरोपी २) आशिष प्रल्हाद उमाठे, वय २७ वर्ष ३) शत्रृघ्न काटे तिन्ही रा. नरखेड ता. नरखेड ४) अमोल भाउरावजी वानखेडे, वय ४४ वर्ष, रा. वार्ड क्र. ०४, खैरगाव ता. नरखेड याचेवर २ गुन्हे नोंद आहे. **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी क्र. १) प्रभाकर मारोतराव सनेसर, वय ६० वर्ष, रा. अण्णाभाऊ साठे नगर काटोल जि. नागपूर २) अनिष नरेश राजपुत, रा गोन्ही, ह. मु. घुबटमेठ काटोल, जि. नागपुर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०२ नोंद आहे. **पोलीस स्टेशन कुही** अंतर्गत महिला आरोपी हिचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** अंतर्गत आरोपी इंद्रपाल युवराज मसराम, वय ४० वर्ष, रा. महालगाव, ता. भिवापुर, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** अंतर्गत आरोपी राहुल लहुजी रामटेके, वय ४० वर्ष, रा. सालईधाबा, ता. हिंगना, जि. नागपुर याचेवर १ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन पारशिवनी** अंतर्गत आरोपी सोनु उर्फ तुळशीराम बबन

नागपुरे, वय ४० वर्ष, रा. करभांड, ता. पारशिवनी याचेवर १ गुन्हा नोंद अशा एकुण ११ आरोपीतांवर महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०९ गुन्हे दाखल केले आहे.

**नमुद कारवाईत एकुण १) १३ लिटर मोहाफुल गावठी दारू, २) ८९१० मिली देशी दारू असा एकुण ५०५०/— रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

## नागपुर ग्रामीण जिल्ह्यातील ७४८ रेकॉर्डवरील आरोपीतांची घेण्यात आली आरोपी परेड

मा. श्री हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात आज दिनांक १०/०३/२०२६ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनला शरीराविरूध्दचे गुन्हे करणारे, मालमत्ते विरूध्दचे गुन्हे करणारे, महीला व बाल अत्याचार गुन्हेगार ,अवैध दारू, जुगार इतर अवैध धंदयामधील रेकॉर्डवरील आरोपींतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे. **एकुण ७४८ आरोपीतांची आरोपी परेड घेण्यात आली आहे.**

**नागपुर उपविभाग** :— नागपुर उपविभागातील पोलीस स्टेशन बुटिबोरी येथे ३० आरोपी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी येथे ३० आरोपी आणि पोलीस स्टेशन बेला येथे ३२ आरोपी अशा एकुण ९२ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**उमरेड उपविभाग** :— उमरेड उपविभागातील पोलीस स्टेशन उमरेड येथे ३६ आरोपी , पोलीस स्टेशन कुही येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन भिवापुर येथे २३ आणि पोलीस स्टेशन वेलतुर ३० आरोपी अशा एकुण १२१ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**सावनेर उपविभाग :—** सावनेर उपविभागातील पोलीस स्टेशन सावनेर येथे ३० आरोपी , पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे ४० आरोपी आणि पोलीस स्टेशन खापा येथे २९ आरोपी आणि पोलीस स्टेशन केळवद येथे ३१ आरोपी अशा एकुण १३० रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**कन्हान उपविभाग** :— कन्हान उपविभागातील पोलीस स्टेशन कन्हान येथे ३३ आरोपी , पोलीस स्टेशन मौदा येथे ३० आरोपी अशा एकुण ६३ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**रामटेक उपविभाग :—** रामटेक उपविभागातील पोलीस स्टेशन रामटेक येथे ४९ आरोपी , पोलीस स्टेशन पारशिवणी येथे ३६ आरोपी, पोलीस स्टेशन अरोली येथे ३२ आरोपी आणि पोलीस स्टेशन देवलापार येथे येथे २७ आरोपी अशा एकुण १४४ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**काटोल उपविभाग :—** काटोल उपविभागातील पोलीस स्टेशन काटोल येथे ७५ आरोपी , पोलीस स्टेशन कोंढाळी येथे ३१ आरोपी आणि पोलीस स्टेशन नरखेड येथे ५८ आरोपी आणि पोलीस स्टेशन जलालखेडा येथे ३४ आरोपी अशा एकुण १९८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे.

**(सर्व ६ उपविभागातील सर्व २१ पोलीस स्टेशन येथे एकुण ७४८ रेकॉर्डवरील आरोपींची आरोपी परेड घेण्यात आली आहे. )**



मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने